# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११०** **ई-मेल आयडी** :-sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/अभि. धा.१८/ नि.निअ./नेमणूक /परिपत्रक /३८८/१७

दि : १३/०७/२०१७

- परिपत्रक -

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)
३. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (म्हाडा)
४. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
५. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक (एस आर ए)(सर्व)
६. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहा. निबंधक (पदुम) (सर्व)
७. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय:- सहकारी संस्थाच्या निवडणूकांकरीता निर्वाचन अधिकारी यांचे नेमणूकीबाबत**

**संदर्भ:- मा उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे याचीका क्र २१७०/१७ मधील दि.२८/०२/२०१७ चे आदेश**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत करण्यात आले असून प्राधिकरणास उक्त नमूद कलमान्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांच्या निवडणूका, नैमित्तिक रिक्त जागा व पदाधिकारी इ. च्या निवडणूका घेण्याचे अधिकार प्राप्त आहेत. प्राधीकरणाच्या धोरणानुसार सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणूक ही वेळेवर, अचूक मतदार यादीवर आधारीत, मोकळया वातावरणात तसेच पारदर्शक पध्दतीने नियमानुसार घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्था (समित्यांच्या निवडणूका) नियम २०१४ चे नियम ३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणास सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता अधिकारी प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये नियम ३ (i) मधील तरतूदीप्रमाणे निवडणूकीचे कामकाज पार पाडण्याकरीता आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांचे नेमणूकीबाबतची तरतूद आहे. त्याच प्रमाणे नियम ७५(२) (b) मध्ये "क" वर्गीकरणातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकारी व

कर्मचारी यांची नेमणूक करण्याबाबतचे अधिकार तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. नियम ७५(२) (b) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**नियम ७५(२) (b)** — तालुका किंवा क्षेत्रीय सहकारी निवडणूक अधिकारी, सहकार विभागातील कार्यालयामधून निर्वाचन अधिका-याची नेमणूक करेल आणि निर्वाचन अधिकारी तालुका किंवा क्षेत्रीय सहकारी निवडणूक अधिका-यांच्या मान्यतेने निवडणुकीचा कार्यक्रम तयार करेल.

४/- नियम ७५(२) (b) मध्ये नमूद तरतूदीचे अवलोकन केले असता सहकार विभागातील कार्यालयामधून म्हणजेच सेवेत कार्यरत असणा-या व्यक्तींचीच निर्वाचन अधिकारी म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. तथापी तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, भोकर, जि नांदेड यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. हसापूर, ता भोकर, जि नांदेड या संस्थेचे निवडणूकीचे कामकाज पार पाडण्याकरीता सेवानिवृत्त सहायक निबंधकांची नियुक्ती केलेली होती. याबाबत मा उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल याचीका क्र. २१७०/१७ मध्ये मा उच्च न्यायालयाने सहकार विभागाच्या सेवानिवृत्त अधिका-याची प्रस्तुत सहकारी संस्थेचे निवडणूकीकरीता निर्वाचन अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती रदबादल केलेली आहे. याबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.२८/०२/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये परिच्छेद १८ व १९ मध्ये नियम ७५(२) (b) बाबतचे विस्तृत विवेचन केलेले आहे. सदर बाब विचारात घेता सहकारी संस्थांच्या निवडणूकीकरीता निर्वाचन अधिकारी नेमताना सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येऊ नये असे आपणास सूचीत करण्यात येत आहे. याबाबत काटेकारपणे दक्षता घेण्यात यावी. सदर परिपत्रकातील सूचनेचे उल्लंघन झाल्यामुळे भविष्यात उदभवणा-या न्यायप्रविष्ठ व आर्थीक नुकसानीच्या बाबींकरीता संबधीत तालुका निवडणूक अधिकारी यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१३/०७/१८

(यशवंत गिरी)
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर—**
मा आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे स्वीय सहायक कक्ष

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना —**

१. सह सहकारी निवडणूक आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, पुणे (सर्व)
२. उप सहकारी निवडणूक आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, पुणे (सर्व)
३. सहायक सहकारी निवडणूक आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, पुणे (सर्व)
४. कक्ष अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, पुणे (सर्व)